बुधवार दि.१५ जानेवारी २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
–ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक लोकनेता
बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत    संपादक : ज्ञानेश्वर मुंढे



सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ
मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४



RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१२६ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in


# अखेर वाल्मिक कराडवर मकोका; खंडणी प्रकरणात १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड | प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील केज न्यायालयानं खंडणी प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराडबाबत महत्वाचा निर्णय दिला आहे. वाल्मिक कराडवर मकोका लावला आहे. कराडला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी देण्यात आली आहे. खंडणी प्रकरणाबाबत वाल्मिक कराडलाआज बीडच्या केज न्यायालयात हजर करण्यात आलं होतं. दरम्यान, खंडीणीबाबत वाल्मिक कराडला १४ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती. त्याची मुदत आज संपली आहे. त्यानंतर आज केज न्यायालयात वाल्मिक कराडला हजर करण्यात आलं होतं. त्यावेळी वाल्मिक कराडवर मकोका लावण्यात आला आहे. तसेच १४ दिवसांची न्यायालयीनं कोठडी देण्यात आली आहे. दरम्यान, संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा मुख्य सुत्रधार वाल्मिक कराड असल्याचा आरोप करण्यात येत आहे. त्यामुळंया प्रकरणात वाल्मिक कराड यांच्यावर मकोका लावण्यात यावा अशी मागणी अनेक राजकीय नेत्यांनी केली होती. त्यानंतर आज अखेर वाल्मिक कराडवर मकोका लावण्यात आला आहे. त्यामुळं वाल्मिक कराडच्या अडचणीत वाढ झाली आहे. संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणात ८ आरोपींवर मकोका लावण्यात आला होता. मात्र वाल्मिक कराडची यातून सुटका झाली होती. मात्र, आज कराडवर मकोका लावण्यात आला आहे.

वाल्मिक कराडला आज बीड जेलमध्ये नेलं जाणार दरम्यान, वाल्मिक कराडला आज बीड जेलमध्ये नेलं जाणार आहे. न्यायालयीन कोठडीमध्ये ठेवलं जाईल. त्यानंतर उद्या मकोका अंतर्गत ताब्यात घेऊन केज जिल्हा व सत्र न्यायालयात हजर केले जाणार आहे. पण आता सेशन कोर्टामध्ये सीआयडीने अर्ज केला आहे, कदाचित सीआयडी त्यांना आज सुद्धा हजर व्हा असं म्हणू शकते.

न्यायालयात सुनावणीला सुरुवात होताच तपास अधिकारी अनिल गुजर यांनी वाल्मिक कराडची दहा दिवसाची पोलीस कस्टडी मागितली होती. व्हाईस सॅम्पल घेतला गेला आहे. तीन मोबाईल वाल्मीक कराड यांचे जप्त केले आहेत. संपत्ती कोणत्या गुन्ह्यातून कमावली आहे का हे तपासायचे म्हणून पीसीआर हवा आहे, असं तपास अधिकारी अनिल गुजर म्हणाले. भारतात अथवा भारताबाहेर काही संपत्ती आहे का?, याचा तपास करायचा आहे, असं तपास अधिकारी अनिल गुजर म्हणाले होते. वाल्मिक कराडच्या वकिलाने देखील कोर्टात जोरदार युक्तिवाद केला आहे. वाल्मि कराडचे वकील सिद्धेश्वर ठोंबरे म्हणाले की, १५ दिवसांपासून वाल्मिक कराड पोलिसाच्या ताब्यात आहे. आणखी कोणता तपास बाकी आहे. बँक खात्याची चौकशी करण्यासाठी तंत्रज्ञान उपलब्ध आहे. त्यासाठी आरोपीची गरज नाही. यापूर्वीचे त्यांच्याविरोधातले १४ गुन्हे नील झाले आहेत. मग त्या गुन्ह्यांचा तपास का करायचा आहे?, सुदर्शन घुले आणि वाल्मिक कराड यांची एकत्र चौकशी करायची होती, तर मग दोन्ही आरोपी १० दिवसांपासून पोलिसांच्या ताब्यात आहे मग तेव्हा का नाही केली? हा सगळा तपास १५ दिवसांपुर्वी करणार होतात. मग १५ दिवसांत काय तपास केला? असा युक्तिवाद वाल्मिक कराडचे वकील सिद्धेश्वर ठोंबरेंनी केला. तसेच वाल्मिक कराड तपासात सहकार्य करत नाही असं तुमचं म्हणणं असेल तर १५ दिवसांत त्यांनी काय सहकार्य केलं नाही ते आम्हाला सांगा. आता पोलीस कोठडीची गरज नाही, असंही सिद्धेश्वर ठोंबरे म्हणाले होते.



**सगळ्या आरोपींना ३०२ आणि मकोकामध्ये घेण्यात यावं, धनंजय देशमुखांची मागणी**

वाल्मिक कराडवर मकोका लावण्यात आला आहे. आता यावर संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी पहिली प्रतिक्रिया दिली आहे. धनंजय देशमुख म्हणाले की, या हत्याकांडातील जे आरोपी आहेत मग ते कोणी पण असो, त्या सगळ्यांना ३०२ आणि मकोकामध्ये घेण्यात यावं, अशी आमची प्रमुख मागणी आहे. मुख्यमंत्र्यांनी म्हटले की, आम्ही कुणालाही सोडणार नाही आमचा मुख्यमंत्र्यांवर विश्वास आहे. आम्ही न्याय मागत आहोत आणि कायम न्यायाच्याच भूमिकेतच राहू, आम्हाला न्याय मिळाला पाहिजे, असे त्यांनी म्हटले आहे. आम्ही एसआयटीचे प्रमुख तेली साहेब यांच्याशी आज चर्चा करणार आहोत. त्यानंतर ते आम्हाला स्पष्टीकरण देतील. आमची त्यांना एकच मागणी आहे की, तपास चांगल्या पद्धतीने झाला पाहिजे. एका लोकप्रतिनिधीची निर्घुण हत्या घडली आहे, ती कोणी घडवून आणली? कशा पद्धतीने झाली? यात कोण कोण सहभागी आहे? या सर्वांना शिक्षा झाली पाहिजे, अशा भूमिकेत आम्ही असल्याचे त्यांनी म्हटलेसंतोष देशमुख यांचे बंधु धनंजय देशमुख यांनी काल पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन केलं होतं. आज खंडणीच्या गुन्ह्यात आरोपी असलेल्या वाल्मिक कराड यांच्या समर्थकांचे आंदोलन सुरु आहे. परळी शहरातील राणी लक्ष्मीबाई टॉवरवर चढून वाल्मिक कराडच्या समर्थकांकडून आंदोलन करण्यात येत आहे. भाजप आमदार सुरेश धस, आमदार संदीप क्षीरसागर यांच्याविरोधात कराड समर्थकांनी आंदोलन सुरू केले आहे.वाल्मिक कराडच्या मातोश्री देखील आता मैदानात उतरल्या आहेत. लेकाच्या न्यायासाठी वाल्मिक कराडच्या मातोश्रींनी परळी पोलीस स्टेशनबाहेर (झरीश्रळ झेश्रळलश डींरींळेप) ठिय्या आंदोलनास सुरुवात केली आहे.

# राज्यस्तरीय कराटे स्पर्धेमध्ये कु.शद्रिका शलाका अमोल चंदनशिवे हिचे यश



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी | अण्णासाहेब साबळे**

कोपरगाव येथे १२ जानेवारी २०२५ रोजी झालेल्या १४ व्या ट्रॅडिशनल शोटोकाँन कराटे असोसिएशन राज्यस्तरीय चॅम्पिअनशिप स्पर्धेत विद्या प्रबोधिनी प्राथमिक शाळा, कोपरगावची विद्यार्थिनी व एस.एस.जी.एम.महाविद्यालयाचे पर्यावरण शिक्षण व जल सुरक्षा या विषयाचे विभाग प्रमुख अमोल चंदनशिवे यांची कन्या कु.शद्रिका शलाका अमोल चंदनशिवे हिने उल्लेखनीय यश संपादन केले.

कोपरगाव येथे संपन्न झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत राज्यातून १० संघ सहभागी झाले होते.कु.वर्षा देठे मॅडम यांच्या सक्षम मार्गदर्शनाखाली अहमदनगर जिल्हा संघ या स्पर्धेत सहभागी झाला होता.

कु. शद्रिका चंदनशिवे हिने आठ वर्षे वयोगटातून कराटे फाईट (कुमीते) प्रकारात गोल्ड मेडल व कता प्रकारात सिल्वर मेडल मिळवून नेत्रदीपक यश मिळवले.

या यशाबद्दल ट्रॅडिशनल शोटोकाँन कराटे राज्यस्तरीय अध्यक्ष प्रा.सुदर्शन पांढरे सर,सरचिटणीस स्नेहल पांढरे मॅडम,प्रशीक्षिका कु.वर्षा देठे मॅडम,प्रशिक्षक चि.पुष्कर बागडे, प्रशिक्षक चि.आदित्य मोहिते प्रशिक्षक चि.श्रवण शिंदे तसेच विद्या प्रबोधिनी प्राथमिक शाळा,कोपरगाव या विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री गवळी सर उपध्यापक श्री.शेटे सर, वर्गशिक्षिका श्रीमती खरे मॅडम यांनी अभिनंदन केले. स्कुल कमिटीचे अध्यक्ष श्री.हेमंत पटवर्धन व सचिव श्री.दिनेश दारुणकर सदस्या सौ.ज्योती कोऱ्हाळकर व सौ.दिपाली पटवर्धन,आबासाहेब पटवर्धन शिशु विकास मंदिरच्या मुख्याध्यापिका सौ.सरिता कोऱ्हाळकर तसेच संस्थेचे पदाधिकारी यांनी तिच्यावर शुभेच्छाचा वर्षाव केला आहे.

## सावित्रीबाई फुले यांच्या स्मारकासाठी निधी देण्याच्या घोषणेबाबत

# महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांचे जाहीर आभार-श्री.बाबू देवकर





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी | अण्णासाहेब साबळे**

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची आणखी पाच वर्षांनी द्विशताब्दी साजरी होणार आहे.यापूर्वी त्यांच्या स्मारकाचे काम पूर्ण करा.यासाठी प्रशासनाने १० एकर जमिनीचे तात्काळ अधिग्रहण करावे अशा सावित्रीबाई फुले यांच्या सन्मानाला साजेशा भव्य स्मारकासाठी निधीची कमतरता पडू देणार अशी ग्वाही श्री.देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जन्मभूमी असलेल्या नायगावच्या मातीतून वेगळी ऊर्जा मिळते छगन भुजबळ यांच्या प्रयत्नामधून या विकासाचा प्रारंभ झाला.उर्वरित विकासकामे केल्याशिवाय सरकार थांबणार नाही.फुले दाम्पत्यांच्या समतेच्या विचाराने सरकार यापुढे काम करेल असे फडणवीस म्हणाले.स्मारकाच्या अधिग्रहणाबाबत माननीय मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांनी तशा सूचना जिल्हाधिकार्यांना दिले आहेत.याबाबत महाराष्ट्र राज्याच्या तमाम नागरिकांच्या वतीने मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांचे सर्व फुले प्रेमी नागरिकांनी आभार मानले आहेत.

# स्वच्छ सर्वेक्षण माझी वसुंधरा माहिती शिक्षण प्रसार अभियान अंतर्गत नागरिकांमध्ये जनजागृती

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मालेगाव | संदीप कदम**

स्वच्छ सर्वेक्षण २०२५ ,माझी वसुंधरा अभियान ५.०,माहिती शिक्षण व प्रसार अभियान अंतर्गत शहरात शून्य कचरा मोहीम राबविणे व त्याबद्दल नागरिकांमध्ये जनजागृती करणे करिता नगरपंचायत अर्धापूर मार्फत दिनदर्शिका प्रकाशित केल्या आहेत.



ज्यात शून्य कचरा मोहीम,एकल वापर प्लास्टिक बंदी, मालमत्ता कर स्वच्छता कर भरणे,पर्यावरन पूरक सण उत्सव साजरे करणे तसेच, कचरा विलगिकरण बद्दल माहिती,माझी वसुंधरा अभियान उद्दिष्टे इत्यादी विषयांवर इत्यंभूत माहिती दिनदर्शिका समवेत छापण्यात आली असून संपूर्ण वर्ष त्यांना अभियान बद्दल माहिती मिळणे करिता आज मा.नगराध्यक्ष श्री.छत्रपती कानोडे, मा.उपाध्यक्ष (प्र.) श्री.मुस्साविर खतीब तसेच मा.मुख्याधिकारी शैलेश फडसे व सर्व सन्माननीय सदस्य आणी नगरपंचायत अर्धापूर अधिकारी,कर्मचारी यांच्या ०हस्ते दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले.

सर्व नागरिकांनी मालमत्ता / नळपट्टी कर इत्यादी कर भरणा वेळेत करून नगरपंचायत बळकट करण्यासाठी सहकार्य करावे असे आवाहन नगरपंचायत अर्धापूर तर्फे करण्यात येत आहे. आपल्या पुढच्या पिढीसाठी आदर्श ठेऊयात...पर्यावरण पूरक सण साजरे करूया... वृक्ष लागवड व संवर्धन करूया... सौरऊर्जेचा वापर करूया.

## नेत्यांमधील मतभेद विचाराधारांबाबत, वैयक्तिक नाही

# राजकारणात आज शत्रू असणारा उद्या मित्र होतो-अमृता फडणवीसांचे सूचक विधान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

अलिकडच्या काही दिवसांपासून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची भाजपसोबत जवळीक वाढली आहे. यावरून मिसेस मुख्यमंत्री अमृता फडणवीस यांनी भाष्य केले. नेत्यांमध्ये विचाराधारांबाबत मतभेद आहेत. त्यामुळे एकेकाळचा शत्रू हा मित्र होतो, मग परत शत्रू होते, अशी कितीतरी उदाहरणे असल्याचे अमृता फडणवीस म्हणाल्या. यावेळी त्यांनी शरद पवारांनी संघाच्या कामाबद्दल केलेल्या कौतुकावर प्रतिक्रिया दिली.

राज्यात सरकार स्थापन झाल्यापासून भाजप आणि ठाकरे गटाची जवळीक वाढत असल्याचे दिसून येत आहे. विधीमंडळाच्या अधिवेशनादरम्यान उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. तर आदित्य ठाकरे हे देखील आतापर्यंत तीन वेळा देवेंद्र फडणवीसांच्या भेटीसाठी गेले होते. शिवाय ठाकरे गटाच्या 'सामना'मधून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कौतुक करण्यात आले. या सर्व घडामोडींवर प्रतिक्रिया देताना अमृता फडणवीसांनी सूचक विधान केले.

# जिजाऊ मातेच्या शिकवणी मुळेच महिलांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडेल-रेखा बनसोड



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव | प्रतिनिधी**

आजची आई उपवास नवस पुजा अर्चा या साऱ्या अंधश्रद्धेत वावरतात आणि त्यांची मुले व्यसनी आळशी बनत चालले आहेत हे विदारक दृश्य थांबवायचे असेल तर आजच्या आईनी राजमाता जिजाऊचा आदर्श आपल्यापुढे ठेवून डोळसपणाने पुढे जाणे गरजेचे आहे कारण जिजाऊमाता या दूरदृष्टीच्या होत्या लोकांच्या कल्याणासाठी त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना घडविले आपणही जिजाऊ मातेसारखी आई व्हावी तरच आपले मुले छत्रपती शिवरायासारखे घडतील असे मत काँग्रेस पार्टी नांदेड जिल्हा सरचिटणीस रेखाताई बनसोडे यांनी आयोजित जयंती कार्यक्रमात व्यक्त केले.

नायगाव शहरात आयोजित केलेल्या राजमाता जिजाऊ यांच्या जयंती कार्यक्रमात अध्यक्षस्थानी रेखाताई बनसोडे यांच्या हस्ते जिजाऊ मातेच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केल्यानंतर सामूहिकरीत्या जिजाऊ वंदना घेण्यात आली. उपस्थित महिलांना मार्गदर्शन करताना रेखाताई बनसोडे पुढे म्हणाल्या की छत्रपती शिवाजी महाराज यांनी आपल्या स्वराज्यात सर्व प्रजा यांना सुखी समाधानी ठेवले होते पर स्त्रीचा सातत्याने त्यांनी सन्मान केले गोरगरीब लोकांना सढळ हाताने मदत करीत होते म्हणून त्यांना दानशूर राजा छत्रपती शिवाजी महाराज असे संबोधले जाते कारण लहानपणापासूनच त्यांच्यावर मा जिजाऊचे संस्कार होते आपणही आपली मुले संस्कारित होण्यासाठी जिजाऊ मातेची प्रेरणा घ्यावी असे मार्मिक विचार रेखाताई बनसोडे यांनी उपस्थित महिलांना दिले. यावेळी सावित्रीबाई शेवाळकर, अहिल्याबाई कांबळे,चंद्राबाई गायकवाड,वैशाली अडकते, किरणबाई भालेराव, हनमाबाई कांबळे हेमाबाई कांबळे यासह अनेक महिलांची उपस्थिती होती.

## संपादकीय..

# एकनाथ शिंदे पुन्हा उभारी घेणार



लोकनेता न्यूज नेटवर्क

गेल्या दीड महिन्यांपूर्वी महाराष्ट्रात झालेल्या विधानसभा निवडणुकांनंतर राज्यातील झपाट्याने बदललेली राजकीय परिस्थिती लक्षात घेता महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तसेच सध्याच्या देवेंद्र फडणवीस सरकारमधील क्रमांक दोनचे उपमुख्यमंत्री आणि शिवसेना या पक्षाचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्यासमोर आगामी काळात स्वतःबरोबरच शिवसेनेला पक्ष म्हणून पुन्हा बळकट करत उभारी देण्याचे अवघड आव्हान उभे ठाकले आहे.

महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुका संपन्न झाल्या आणि निवडणूक निकालानंतर राज्याचे मुख्यमंत्रीपद भाजपाकडे आणि त्यातही शिंदे सरकारमधील उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे जाणार हे स्पष्ट झाल्यानंतर त्याचा सर्वाधिक मानसिक परिणाम हा एकनाथ शिंदे यांच्यावर झाला. भाजपाला महाराष्ट्रात रेकॉर्ड ब्रेक १३२ अधिक पाच अपक्ष १३७ आमदारांचे प्रथमच भरगच्च असे पाठबळ मिळाले, तर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला ५७ आमदारांचे बळ प्राप्त झाले. अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीला ४१ आमदार विधानसभेवर निवडून आणता आले. उबाठा २०, काँग्रेस १५, तर शरद पवार यांच्या राष्ट्रवादीला अवघ्या दहा जागांवर यश मिळवता आले. या निकालाने महाराष्ट्रातील भाजपा विरोधी महाआघाडीचा सुपडा पूर्णपणे साफ करून टाकला. महाराष्ट्रातील जनतेने महायुतीला तर भरभरून यश दिलेच मात्र त्याचबरोबर भारतीय जनता पक्ष हा स्वबळावर महाराष्ट्रातील सर्वात मोठा पक्ष म्हणून या निवडणुकीत उभारून आला. भाजपाच्या या प्रचंड यशाचे परिणाम ज्याप्रमाणे विरोधी पक्षांवर होत आहेत त्याचबरोबर काही प्रमाणात महायुतीतील घटक पक्षांवर देखील भाजपाच्या या प्रचंड यशाचा परिणाम झालेला दिसत आहे. त्यातही प्रामुख्याने उपमुख्यमंत्री व शिवसेनेचे प्रमुख नेते एकनाथ शिंदे यांच्यावर बदललेल्या राजकीय परिस्थितीचा परिणाम जाणवताना स्पष्टपणे दिसत आहे. बदललेल्या राजकीय परिस्थितीमधून स्वतःला सावरून शिवसेनेला पुन्हा उभारी देण्याचे एक मोठे आव्हान एकनाथ शिंदे यांच्यासमोर उभे आहे. याचे सर्वात प्रमुख कारण आहे ते म्हणजे राज्यात आगामी काळात होऊ घातलेल्या महापालिका नगर परिषद, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती यांच्या निवडणुका हे आहे.२०१९ पूर्वीची महाराष्ट्रातील राजकीय परिस्थिती आणि २०१९ नंतर व त्यानंतर एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेत उठाव केल्यानंतरची राजकीय स्थिती यामध्ये जमीन आसमानाचा फरक आहे. त्याचप्रमाणे एकनाथ शिंदे हे राज्याचे मुख्यमंत्री झाल्यानंतरची राजकीय परिस्थिती आणि आता महाराष्ट्रात दोन महिन्यांपूर्वी झालेल्या राजकीय सत्ता सारीपटावरील स्थित्यंतरानंतरची परिस्थिती यातही खूप मोठा फरक पडला आहे. देवेंद्र फडणवीस यांचे उपमुख्यमंत्री पदावरून पुन्हा तिसऱ्यांदा मुख्यमंत्री होणे हे जसे मोठे धक्कादायक होते त्याचप्रमाणे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे उपमुख्यमंत्री होणे हे देखील त्यांच्यासाठी अवघड स्थितीतले होते. या अवघडलेल्या स्थितीतून एकनाथ शिंदे हे अद्यापही पूर्णपणे सावरल्याचे दिसून येत नाही. ते सावरण्याचा प्रयत्न जरूर करत आहेत तथापि त्यांची काम करण्याची जी एक पद्धत आहे या कार्यपद्धतीला काहीसा ब्रेक या राजकीय व्यवस्थेमध्ये लागल्याचे दिसते. मुख्यमंत्र्यांप्रमाणे अमर्याद अधिकार आता उपमुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे यांच्याकडे नाहीत. त्याचबरोबर दुसरीकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उबाठामध्ये ज्या भेटीगाठी होत आहेत त्या देखील एकनाथ शिंदे यांच्यासाठी अनुकूल नाहीत. या सरकारमधील दुसरे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यामुळे देखील एकनाथ शिंदे यांची सरकारमध्ये काहीशी कोंडी झाल्यासारखी स्थिती आहे. या सर्व परिस्थितीवर मात करून एकनाथ शिंदे यांना पुन्हा एकदा राज्याच्या राजकारणात स्वतःला आणि त्याचबरोबर शिवसेनेला उभारी आणण्यासाठी कंबर कसून जोमाने उभे राहावे लागणार आहे. अर्थात हे जेवढे वाटते तेवढे एकनाथ शिंदे यांच्यासाठी आता सरळ सोपे आणि साधे राहिलेले नाही. शतप्रतिशत भाजपाचा नारा हा देखील एकनाथ शिंदे यांच्यासाठी आगामी काळात आव्हानात्मक असणार आहे. एकनाथ शिंदे यांचा आगामी काळात पहिलाच मोठा आणि जंगी सामना हा उद्धव ठाकरे यांच्याबरोबर मुंबई महापालिका निवडणुकीतच होणार आहे.मुंबई महापालिका हा उद्धव ठाकरे यांचा श्वास आहे. त्यामुळे भाजपाच्या मदतीने मुंबई महापालिका जिंकणे हे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. मुंबई महापालिका जर एकनाथ शिंदे हे जिंकून देऊ शकले तरच राज्यातील आणि केंद्रातील सत्तेत त्यांचे स्थान अधिक भक्कम आणि बळकट होऊ शकते. यासाठी एकनाथ शिंदे यांना सर्वात आधी म्हणजे स्वतःमधील नैराश्य हे पूर्णपणे झटकून पुन्हा नव्या उमेदीने सामान्य जनतेसाठी आणि कार्यकर्त्यांसाठी उभे राहावे लागणार आहे. अर्थात हे करत असताना स्वतःच्या भोवती सतत कार्यकर्त्यांची, पदाधिकाऱ्यांची आणि त्याचबरोबर सर्वसामान्यांची प्रचंड गर्दी म्हणजेच सर्वात लोकप्रिय आणि यशस्वी नेता असणे या गोड गैरसमजातून त्यांना लवकरात लवकर बाहेर पडावे लागणार आहे. त्याचप्रमाणे सत्तेतील नेमके संधी साधू कोण आहेत याचा शोध जर का एकनाथ शिंदे हे घेऊ शकले, तर त्यांच्या हाती जे सत्य लागेल ते पचवणे हे त्यांनाही अत्यंत अवघड होऊन बसेल. मात्र या कटू सत्याचा शोध घेण्याचे धाडस हे देखील कधीतरी शिवसेनेसारख्या आक्रमक पक्षाचा मुख्य नेता म्हणून एकनाथ शिंदे यांना करावेच लागणार आहे आणि जर का ते आत्ता करू शकले नाहीत, तर झपाट्याने बदलत असलेल्या राजकीय स्थितीत ही संधी देखील त्यांच्या हातातून गेलेली असेल.सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे आगामी काळात होऊ घातलेल्या मुंबई महापालिका, ठाणे महापालिका, कल्याण-डोंबिवली महापालिका तसेच राज्यातील अन्य महापालिका जिल्हा परिषदा पंचायत समित्या अशा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या त्या-त्या जिल्ह्यातील स्थानिक नेत्यांसाठी सर्वसामान्य शिवसैनिकांसाठीही ज्यांनी उद्धव ठाकरे यांची साथ सोडून एकनाथ शिंदे यांचा हात पकडला आहे. अशा शिंदे समर्थकांसाठी अनन्यसाधारण महत्त्वाच्या आहेत. लोकसभेत खासदारांचे बळ वाढण्यासाठी आणि विधानसभेत अधिकारी आमदार निवडून येण्यासाठी स्थानिक कार्यकर्ते पदाधिकारी आणि त्याचबरोबर महापालिका जिल्हा परिषद पंचायत समिती यांच्यामधील सत्ता ही राज्याच्या आणि देशाच्या राजकारणात मोठी भूमिका बजावत असते. २०२४ च्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या वेळी राज्यात महापालिका आणि जिल्हा परिषदा या अस्तित्वात नव्हत्या. मात्र तरी देखील भाजपा शिवसेना आणि राष्ट्रवादी यांना विधानसभा निवडणुकीत दणदणीत यश मिळाले याचे प्रमुख कारण म्हणजे महायुतीची सत्ता ही राज्यात होती आणि मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे यांनी स्थानिक नेतृत्वाला बळकट करण्याबरोबरच त्याला त्या मतदारसंघात पुन्हा नव्याने निवडून येण्यासाठी जे काही पाठबळ द्यावे लागते ते पूर्ण ताकतीनिशी एकनाथ शिंदे यांनी पाठीशी उभे करून दिले होते. २०१४ पासून भाजपाची केंद्रात आणि राज्यात सत्ता असल्यामुळे भाजपाचा संघटना विस्तार हा स्थानिक पातळीवर मोठ्या प्रमाणावर फोफावलेला आहे. त्याचाच मोठा फायदा भाजपाला या विधानसभा निवडणुकीत झाला. हे जर लक्षात घेतले, तर आगामी महापालिका जिल्हा परिषद आणि पंचायत समिती जिंकण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पुन्हा नव्याने शिवसेनेला विजयी करण्यासाठी कंबर कसावी लागणार आहे.

# तरच गुन्हेगारीला आळा बसेल

लोकनेता न्यूज नेटवर्क



मराठवाड्यातील बीडच्या गुन्हेगारीवरून संपूर्ण महाराष्ट्रात रणकंदन माजले आहे. तसे पहिले तर मराठवाड्यात खरोखरच गुन्हेगारीचे प्रमाण वाढले आहे; परंतु ही गुन्हेगारी केवळ मराठवाड्यापुरती सीमित नाही, तर संपूर्ण महाराष्ट्रात हा प्रकार दिसून येतो. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गृहखाते असल्याने ते नक्कीच याकडे विशेष लक्ष देतील, यामध्ये दुमत नाही.

अभयकुमार दांडगे

गुन्हेगारी अचानक वाढत नसते. अनेकदा गुन्हेगारीमागे राजकीय वरदहस्त असतो. गुन्हेगारी संपवायची असेल, तर ते शक्यही आहे व अशक्यही आहे. याबाबत अनेकदा वेगवेगळी मतमतांतर समोर येतात. महाराष्ट्राच्या बाबतीत बोलावयाचे झाले तर, सत्ता कोणाची, सत्तेवर कोण, गुन्हेगारविश्वाची चर्चा कशी व कुठपर्यंत यावर देखील कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीत बोलता येईल. कुठल्याही राज्यात गुन्हेगारी कमी झालेली नाही. गुन्हेगारी कमी करण्यासाठी पोलीस प्रशासनाला मोकळ्या हाताने काम करू देणे अत्यंत आवश्यक आहे. राजकारणी लोकांचा हस्तक्षेप नसेल तर अनेकदा गुन्हेगारांना फाशीपर्यंत पोहोचविता येते; परंतु अनेकदा गुन्हेगारांना वाचविण्यात राजकारणी लोकांचा हात असतो, अशी ओरड होत असते. अलीकडच्या काळात महाराष्ट्रात गुन्हेगारीने तोंड वर काढल्याने चिंता व्यक्त केली जात आहे.मराठवाड्यातील बीडच्या प्रकरणाने हा विषय अधिक प्रमाणात चर्चेत आला आहे. राज्याचे मंत्री धनंजय मुंडे यांच्याशी जवळीक असलेले वाल्मिक कराड यास अटक करावी, या मागणीसाठी बीडमध्ये मोठा मोर्चा निघाला. बीड जिल्ह्यातील जवळपास सर्वच आमदारांनी हा प्रश्न उचलून धरला. मराठवाड्यातील तुळजापूर जवळील एका सरपंचाला पवनचक्की प्रकरणात अपहरण करण्याचे प्रकरणही ताजेच आहे. या व मराठवाड्यातील इतर प्रकरणांवरून पोलीस प्रशासनावर ताशेरे ओढले जातआहेत. शिवाय पुणे जवळील हडपसरमधील शेतकरी तसेच हॉटेल व्यावसायिक सतीश वाघ यांच्या खून प्रकरणात त्यांची पत्नी मोहिनी वाघ हिला अटक करण्यात आली. पत्नीनेच वाघ यांच्या खुनाची सुपारी दिल्याचे पोलीस तपासातून स्पष्ट झाले आहे. मोहिनीने अक्षय जावळकरच्या मदतीने सतीश वाघ यांचा सुपारी देऊन खून घडवून आणला. सहा महिन्यांपासून पतीला संपविण्यासाठीची तयारी सुरू होती. अक्षय बरोबरच्या संबंधाबद्दल पतीला समजले. त्यानंतर तिने अक्षयला खुनाची सुपारी दिली. या प्रकरणात, मोहिनीला अटक करून न्यायालयात हजर करण्यात आले होते. हे प्रकरण देखील महाराष्ट्रात सध्या चर्चेत आहे. मराठवाडा तसेच महाराष्ट्रातील इतर काही कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नावरून सध्या वेगवेगळी चर्चा केली जात आहे. भारतातील अनेक प्रांतापैकी महाराष्ट्र हे अत्यंत प्रगत, महापुरुषाचे आणि संताची भूमी असलेले राज्य म्हणून ओळखले जाते.

आपला महाराष्ट्र काल परवापर्यंत इतर राज्यांसाठी एक आदर्श राज्य म्हणून चर्चेत होता. अनेकजण महाराष्ट्राच्या राजकारण, समाजकारण, सांस्कृतिक क्षेत्राबद्दल अत्यंत चांगुलपणाने बोलत असते. कधीकाळी उत्तर प्रदेश, बिहार ही राज्ये अधांधुंद, गुन्हेगारीचे राज्ये म्हणून ओळखली जात. गुन्हेगारीचे राज्य असा त्यांचा परिचय होता. अर्थात अनेक गुन्ह्यांच्या आलेखात ती राज्ये वरच्या क्रमांकावर होती, मात्र आता त्या राज्यांना मागे टाकत महाराष्ट्रावरच्या क्रमांकावर आला आहे. राष्ट्रीय गुन्हे अन्वेषण संस्थेच्या वतीने २०२० सालातील गुन्हेगारीच्या संदर्भातील अहवाल नुकताच प्रकाशित करण्यात आला. भारतात एकूण ६६ लाख १ हजार २८५ गुन्ह्यांची नोंद झाली आहे. त्या एकूण गुन्ह्यांपैकी महाराष्ट्राच्या नावावरती ५ लाख ३९ हजार गुन्ह्यांची नोंद झाली आहे. २०१९ पेक्षा २९ हजार ५७० ने अधिकचे गुन्हे एका वर्षात नोंदविण्यात आले आहेत. ही वाढ सुमारे ५.४९ टक्के इतके आहे. राज्याच्या गुन्हेगारीचे प्रमाण सुमारे ८.१७ टक्के इतकी आहे. शंभर लोकांच्या मागे सुमारे नऊ गुन्हे हे विचार करायला भाग पाडत आहेत. देशात बाल गुन्हेगारीचे १ लाख २८ हजार ५३१ गुन्हे नोंदविण्यात आले असून त्यापैकी एकट्या महाराष्ट्रात १४ हजार ३७१ गुन्ह्यांची नोंद आहे. देशात महिलांवरील अत्याचाराचे ३ लाख ७१ हजार ५०३ गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे. उत्तर प्रदेशात ४९ हजार ३८५ गुन्ह्यांची नोंद करण्यात आली असून ते राज्य प्रथम क्रमांकावर आहे. भारतातील आर्थिक गुन्हेगारीच्या संदर्भाने आर्थिक भ्रष्टाचार व गैरव्यवहाराचे संदर्भाने नोंदविण्यात आलेल्या तीन हजार १०० गुन्ह्यांपैकी एकट्या महाराष्ट्रातील ६६४ गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे. हे प्रमाण शेकडा २२ टक्के इतके आहे.भ्रष्टाचारात महाराष्ट्र हे देशातील प्रथम क्रमांकाचे राज्य ठरले आहे. देशात सायबर गुन्हेगारी संदर्भाने ५० हजार ३५ गुन्ह्यांची नोंद करण्यात आली असून महाराष्ट्रात पाच हजार ४९६ गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. भारतात नोंदविल्या गेलेल्या तीस हजार १८३ खुनांच्या गुन्ह्यांपैकी महाराष्ट्रात २ हजार २२९ गुन्ह्यांची प्रकरणे नोंदविण्यात आली आहेत. खुनांच्या बाबतीत महाराष्ट्र देशात दुसऱ्या क्रमांकावर आहे. उत्तर प्रदेश प्रथम क्रमांकावर आहे. ज्येष्ठ नागरिकांवरील अत्याचारात महाराष्ट्रात वाढ झाली असून देशातील २४ हजार ७९४ गुन्ह्यांपैकी एकट्या महाराष्ट्रात ४ हजार ९०९ गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर आहे. भारतातील अनुसूचित जातीच्या व्यक्तींवर झालेल्या अत्याचारांमध्ये ५० हजार २९१ गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. त्यापैकी २ हजार ५६९ गुन्हे महाराष्ट्रातील आहेत. जमाती संवर्गातील आठ हजार २७२ गुन्हे संपूर्ण भारतात नोंदविण्यात आले आहेत, त्यापैकी ६६३ महाराष्ट्रातील आहेत. राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गृहखाते आहे. त्यांनी महाराष्ट्रातील विस्कटलेली घडी नीट बसवावी, अशी त्यांच्याकडून महाराष्ट्रातील तमाम जनतेची अपेक्षा आहे. महाराष्ट्रातील जनतेच्या अपेक्षांना ते पूर्णही होतील, परंतु यासाठी थोडासा वेळ नक्कीच लागणार आहे. इतर राजकारण्यांपेक्षा फडणवीस यांची दृष्टी वेगळी व विकासात्मक, निःस्पृह आहे. त्यामुळे महाराष्ट्रात कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीत नक्कीच अच्छे दिन येतील, अशी अपेक्षा करायला हरकत नाही. शेवटी समाजातील जडण-घडण व व्यक्ती तेवढ्या प्रवृत्ती याप्रमाणे सर्वच गोष्टी रोखणे कोणाच्याही हातात नाही.पोलीस कायदा व सुव्यवस्था अबाधीत ठेवण्यासाठी पुढाकार घेऊ शकतात. शेवटी समाजावर कोणाचा तरी धाक असणे आवश्यक आहे. पोलिसांनी त्यांची भूमिका इमानेइतबारे वठविल्यास नक्कीच गुन्हेगारी कमी होऊ शकते. शेवटी समाजात वावरणारे गुन्हेगार व पोलीस एकमेकांना ओळखून असतात, असे अनेकदा बोलले जाते. त्यामुळे पोलिसांनी शेवटी त्यांचा त्यांनीच निर्णय घ्यावा, म्हणजे समाजातून होणारी टीका व त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोण नक्कीच बदलेल, यात आम्हाला तरी शंका नाही. मराठवाड्यात मात्र नक्कीच गुन्हेगारी संपविण्यासाठी गृहखात्याला विशेष पुढाकार घेणे अत्यंत गरजेचे आहे.

# मुंबईला वायू प्रदूषणाचा विळखा

लोकनेता न्यूज नेटवर्क



हिवाळा ऋतू सर्वांना हवा हवासा वाटत असला तरी या ऋतूमधील डिसेंबर आणि जानेवारी महिने हवेतील प्रदूषणाला प्रचंड प्रमाणात पोषक असतात. सतत विविध प्रकारची कामे सुरू असलेल्या ठाणे, मुंबईसारख्या शहरांमधील हवेत धुळीचे प्रमाण जास्त प्रमाणात आढळून येते. थंड हवेमुळे वातावरणातील धूळ वर न जाता ती काही फुटांच्या अंतरावर तरंगत राहते. अशा धुळयुक्त हवेचा मानवावर, प्राण्यांवर विपरीत परिणाम होण्याचा धोका असतो. त्यामुळे धुळीसोबतच हवेतील सल्फर डायऑक्साईड, नायट्रॉजन ऑक्साईड आणि इतर विषारी घटकांचे प्रमाण वाढते. देशाच्या आर्थिक राजधानीमध्ये सध्या हेच चित्र पाहायला मिळत आहे. मुंबईनगरीत वायू प्रदूषणाने इतके टोक गाठले आहे की, सध्याची प्रदूषणाची पातळी ही दिवसाला साडेतीन किंवा महिन्याला १०५ सिगारेटच्या धुराइतकी आहे. वाढत्या वायू प्रदूषणामुळे गेले काही दिवस मुंबईतील काही भागांमध्ये मोठ्या प्रमाणात धुरके दिसून येत आहे. हवा विषारी तर झाली आहेच; पण मुंबईचाही श्वास कोंडला आहे. परिस्थिती अशी आहे की, सततच्या प्रदूषणामुळे निर्माण झालेल्या विषारी धुरक्यामुळे रस्त्यांची दृश्यमानता कमी झाली आहे. शहरातील दृश्यमानता दोनशे ते तीनशे मीटर इतकी कमी झाली होती, त्यामुळे जवळपासच्या गगनचुंबी इमारतीही क्वचितच दिसत होत्या. सर्वात आश्चर्याची बाब म्हणजे धुक्यामुळे गेल्या शुक्रवारी दिवसभर सूर्यदेवाचे दर्शनही झाले नाही.

मुंबई शहर आणि उपनगरातील प्रमुख ५ ठिकाणी हवा प्रचंड दूषित आहे. याशिवाय १० ठिकाणची हवा आरोग्यास घातक आहे. हवा गुणवत्ता निर्देशांकाच्या (एक्यूआय) संकेतस्थळावरील माहितीनुसार, काल मालाड, माझगाव, नेव्हीनगर कुलाबा, सिद्धार्थनगर, वरळी आणि वांद्रे-कुर्ला संकुल-बीकेसी येथील एक्यूआय तीनशे पार गेला आहे. या ठिकाणी प्रदूषणाची पातळी अति खराब कॅटेगरीमध्ये नोंदली गेली आहे. या प्रमुख ठिकाणांसह तब्बल ठिकाणची हवा गुणवत्ता निर्देशांक २०० ते ३०० एक्यूआय दरम्यान आहे. ही पातळी आरोग्यास अपायकारक हवेच्या कॅटेगरीमध्ये मोडते. यात वांद्रे-पूर्व, बोरिवली-पूर्व, छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ, देवनार, जुहू, भांडूप-पश्चिम, अमेरिकन वकिलाती कार्यालय- बीकेसी, नेरूळ, सायन, विलेपार्ले आदी ठिकाणांचा समावेश आहे. कमाल तापमानामध्ये घट झाल्याने हवेतील आर्द्रता वाढत आहे. त्यामुळे वातावरणातील धुळीचे कण त्याच स्थितीत राहतात. समुद्रातून येणाऱ्या वाऱ्यांमुळे हवेतील आर्द्रता वाढत असल्याचे हवामान खात्याचे म्हणणे आहे. हा आठवडाभर हीच स्थिती कायम राहणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. मुंबईतील वाढत्या प्रदूषणाला मोठ्या प्रमाणात सुरू असलेली पायाभूत सुविधांची कामे, अनियंत्रित वाहतूक व्यवस्था आदी कारणीभूत आहेत. मुंबईत सध्या एकाच वेळी मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधांच्या निर्मितीची कामे सुरू आहे. त्यात मेट्रो आणि कोस्टल रोडच्या कामाचाही समावेश आहे. याशिवाय दर अर्ध्या किलोमीटरवर गगनचुंबी इमारतीचे बांधकाम सुरू असल्याचे पाहायला मिळत आहे. अनेक ठिकाणी बांधकाम सुरू असताना आणि जुने बांधकाम पाडताना प्रचंड धुळ उडते. तोडकाम करताना सदर जागेसभोवती हिरवा कपडासभोवती बांधण्याच्या सूचना महापालिकेकडून देण्यात आलेल्या आहेत. मात्र फार कमी लोकांकडून त्याची अंमलबजावणी होते. मागील काही दिवसांमध्ये महापालिकेने अशा जवळपास ९०० बांधकाम ठिकाणांची पाहणी करून नियम मोडणाऱ्या २८ विकासकांवर कारवाई केली आहे.

उघड्यावर डेब्रिज वाहून नेणाऱ्या वाहनांवर महापालिकेने महिनाभरात मोठी कारवाई करताना जवळपास १२ लाख रुपयांचा दंडही वसूल केला आहे. मुंबईत २५० पेक्षा अधिक स्मशानभूमी आहेत. यातील बहुतांश स्मशानभूमीमध्ये अजूनही लाकडांचा वापर केला जातो. या धुरामुळे प्रदूषणात वाढ होत असल्याने लाकूड आधारित ४१ स्मशानभूमींचे इलेक्ट्रिक किंवा पीएनजी आधारित दहनभूमीत रूपांतरण करण्यात येत आहे. भविष्यात अधिकाधिक स्मशानभूमींचे अशाप्रकारे रूपांतरण करण्याचा पालिकेचा मानस आहे. मुंबईत सध्या १२ लाखांपेक्षा जास्त खासगी कार आहेत. त्यामुळे रस्त्यांवर वाहतूक नेहमी ठप्प झालेली दिसून येते. इच्छित स्थळी जाण्यासाठी दुप्पट वेळ लागत आहे. रस्त्यावर सतत धावणाऱ्या वाहनांमुळे प्रदूषणाची पातळी वाढत आहे. अनियंत्रित वाहतूक व्यवस्थेचाही थेट परिणाम प्रदूषण वाढीवर होत आहे. समुद्रातील तापमानात घट, उंच इमारतींमुळे हवेचा बदललेला पॅटर्नही वायू प्रदूषणाला खतपाणी घालत आहे. गगनचुंबी इमारती समुद्रातील वाऱ्यांना त्यांचे काम करू देत नाहीत. ऑक्टोबर हिट आणि मान्सून परतण्यास लागलेला उशीर हेही एक कारण आहे. थंडीचे कमी-अधिक प्रमाण तसेच वाढते प्रदूषण पाहता श्वसनाशी संबंधित रोगांचा प्रादूर्भाव वाढला आहे. त्याचा सर्वाधिक त्रास लहान मुलांसह महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना होत आहे. थंडीपासून दूर राहण्यासाठी उबदार कपडे घालावेत. शक्य असल्यास थंड हवामान टाळा.थंड पदार्थांचे सेवन मर्यादित असावे. विशेषतः कोणत्याही आजाराची लक्षणे दिसू लागल्यास न डगमगता तातडीने महापालिकेच्या किंवा खासगी रुग्णालयातील डॉक्टरांशी संपर्क साधावा, असे महापालिकेतर्फे सांगण्यात आले आहे. राजधानी दिल्लीप्रमाणे मुंबईची हवा प्रदूषित होऊ नये यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ सतर्क आहे. हवेमधील प्रदूषणाचे प्रमाण ओळखून त्यावर त्वरित उपाययोजना करण्यासाठी प्रदूषण नियंत्रण मंडळाने निरंतर हवा तपासणी यंत्र बसवले आहेत. याशिवाय मुंबई महापालिकेकडून रस्ते पाण्याने धुऊन काढले जात आहेत. प्रदूषण रोखण्यासाठी पालिकेकडून हरतरेचे प्रयत्न केले जात असले तरी नियम मोडणाऱ्यांविरोधात आणखी कडक कारवाई करण्याची गरज आहे.

# डिसेंबर महिन्याच्या कामगिरीत कुरुंदा पोलीस ठाणे नांदेड परिक्षेत्रात अव्वल

लोकनेता न्यूज नेटवर्क

नांदेड | बाजीराव गायकवाड

नांदेड परिक्षेत्रातील सर्व पोलीस ठाण्यांचे पोलीस कामकाजाशी संबंधित विषयावर दर महिन्यास परिक्षण करुन त्यांना प्रोत्साहनपर बक्षिसे देण्याची योजना नांदेड परिक्षेत्रात सुरु करण्यात आली आहे. गुन्हे निर्गती, गुन्हे उघडकीस आणण्याचे व मालमत्ता हस्तगत करण्याचे प्रमाण, अर्ज चौकशी, चारित्र्ग पडताळणी, पासपोर्ट, समंस व वॉरंट बजावणी, फरारी व पाहिजे असलेले आरोपी अटक करणे, प्रतिबंधक कार्यवाही, दोषसिद्धी, सीसीटीएनएस, अभिलेख अद्ययावतीकरण, अवैध व्यवसाय विरोधी कारवाई इत्यादी बाबत प्रत्येक पोलीस स्टेशनने केलेल्या कामगिरीचे दरमहा परीक्षण करण्यात येत आहे.

उपरोक्त महत्त्वाच्या विषयात सर्वोत्कृष्ट कार्मागरी करणाऱ्या पहिल्या तीन पोलीस ठाण्यांना प्रत्येक महिन्यास अनुक्रमे ३०००, २००० व १००० रुपयांचे बक्षीस व प्रशस्तीपत्र देण्यात येते. परिक्षेत्रातील एकूण ९१ पोलीस ठाण्यांचे डिसेंबर महिन्याच्या कामगिरीचे परीक्षण केले असता त्यात. हिंगोली जिल्ह्यातील कुरुंदा पोलीस ठाण्याने सर्वच विभागात सरस कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्याचप्रमाणे, नांदेड जिल्ह्यातील सोनखेड पोलीस ठाण्याने द्वितीय तर हिंगोली जिल्ह्यातील बासंवा पोलीस ठाण्याने तृतीय क्रमांक पटकावला आहे. नागरिकांकडून पोलीस ठाण्यात दाखल होणाऱ्या प्रकरणांचा शिघ्रतेने निपटारा होण्यासाठी व पोलीसांचे कामकाज अधिक जनताभिमुख होऊन, त्यांच्यात निक्कोप स्यभां वाढीस लागानी या दृष्टिकोनातून पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी परिक्षेत्रातील सर्व पोलीस ठाण्यांच्या परीक्षणाची सदर योजना सुरू केली आहे.

डिसेंबर महिन्यात, उत्कृष्ट कामगिरी करून प्रथम क्रमांक पटकावणारे कुरुंदा पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी श्री रामदास निरदोडे, द्वितीय क्रमांक पटकावणारे सोनखेड पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी श्री पांडुरंग माने त्याचप्रमाणे, तृतीय क्रमांक पटकावणारे बासंबा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी श्री विकास आहे यांचा पोलीस उप महानिरीक्षक यांनी बक्षीस व प्रशस्तीपत्र देऊन सन्मान केला आहे.कुरुंदा, सोनखेड व बासंबा येथील प्रभारी अधिकाऱ्यांना संबधित पोलीस ठाण्यात काम करणाऱ्या अधिकारी व अंमलदारांची मोलाची साथ लाभली असल्याने, सदर यशात त्यांचा देखील वाटा महत्वाचा ठरला आहे. पोलीसांची जास्तीत जास्त जनताभिमुख कामकाज करुन नागरिकांच्या अधिकाधिक तक्रारी सोडविण्यावर भर दयावा, असे आवाहन पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी केले आहे.



## अब्दुल सत्तार यांची मोठी घोषणा

# मी यापुढे निवडणूक लढणार नाही:लोकांना विकास नकोय,जातीपातीचे राजकारण सुरू

लोकनेता न्यूज नेटवर्क

सिल्लोड (वृत्तसंस्था)

शिवसेना आमदार अब्दुल सत्तार यांनी यापुढे निवडणूक न लढवण्याची घोषणा केली आहे. सिल्लोड येथील अंभई येथे आयोजित एका कार्यक्रमात बोलताना अब्दुल सत्तार यांनी ही घोषणा केली आहे. त्यांच्या या घोषणेमुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.

कार्यक्रमात बोलताना अब्दुल सत्तार म्हणाले, मी आमदार-मंत्री असताना १८-१८ तास सालदार महिनदार सारखे काम केले. शासकीय योजनेचा लाभ अनेक महिलांना व कामगारांना मिळवून दिला, मतदारसंघाचा विकास केला, पण शेवटी जाती पातीवर निवडणूक झाली व माझा विजय २४२० मतांनी झाला. लोकांना विकास नकोय, जाती पातीवर निवडणुका होत असतील तर आगामी सिल्लोडची नगर परिषद माझी शेवटची निवडणूक राहील. मी यापुढे सिल्लोड विधानसभा निवडणूक लढणार नाही, अशी थेट घोषणाच अब्दुल



सत्तार यांनी केली आहे.

पुढे बोलताना अब्दुल सत्तार म्हणाले, मी मतदारसंघाचा विकास केला, पण शेवटी जाती पातीवर निवडणूक झाली, लोकांना विकास नकोय, तर जाती पातीवर निवडणुका हव्यात. आगामी सिल्लोडची नगर परिषद माझी शेवटची निवडणूक राहील, मी यापुढे सिल्लोड विधानसभा निवडणूक लढणार नाही. कामगारांची नोंदणी करण्यासाठी यंत्रणा राबवली, सिल्लोड सोयगाव मतदार संघाचा विकास केला, सूतगिरणी, मेडिकल कॉलेज, एमआयडिसी आणली. शेतकरी बागायतदार व्हावा, यासाठी पूर्णा नदीवर बेरिजेस बांधण्याच्या कामाला मंजुरी घेतली.आमदार व मंत्री असतांना कोट्यवधी रुपयांचा निधी आणला. पण, विरोधक काहीच कामे न करता, त्यांना माझ्याबरोबरीने मतदान मिळते. विरोधक जाती पातीवर निवडणूक लढवतात, हे राजकारण घातक आहे. जर विकासाला प्राधान्य मिळत नसेल व केवळ जाती पातीवर निवडणुका होत असेल, तर लोकांनी मला आतापर्यंत निवडून दिले त्यांचे आभार, पण मी आता यापुढे सिल्लोड विधानसभा निवडणूक लढणार नाही, अशी खंत अब्दुल सत्तार यांनी व्यक्त केली. तसेच मी माझा मुलगा, माजी नगराध्यक्ष अब्दुल समीर याला सांगितले की, मी निवडणूक लढणार नाही, तुला लढायची असेल, तर बघ नाहीतर जय हिंद जय महाराष्ट्र, असे अब्दुल सत्तार म्हणाले.

## ऑनर किलिंग रोखण्यासाठी सरकारचे मोठे पाऊल

# प्रत्येक जिल्ह्यात सुरू होणार 'सुरक्षागृह' उपसभापती नीलम गोऱ्हेंचे निर्देश

लोकनेता न्यूज नेटवर्क

मुंबई (वृत्तसंस्था)

आंतरजातीय आणि आंतरधर्मीय जोडप्यांना लग्नानंतर सुरुवातीच्या काळात सुरक्षित निवारा महत्वाचा असतो. आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांच्या सुरक्षेचा प्रश्न अनेकदा गंभीर होत असून अशा प्रकरणात बेदम मारहाण ते खुना पर्यंतच्या घटना घडतात. ऑनर किलिंग रोखण्यासाठी राज्य शासनाने प्रत्येक जिल्ह्यात 'सुरक्षागृह' सुविधेचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश विधानपरिषदेचे उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिले.



लातूर, संभाजीनगर, कोल्हापूर येथे झालेल्या ऑनर किलींगच्या घटनांचा सोमवारी उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा घेण्यात आला. बैठकीला महिला व बालविकास आयुक राहुल मोरे, संभाजीनगर विभागीय आयुक्त दिलीप गावडे, पोलिस आयुक्त प्रवीण पवार, पोलिस अधीक्षक कोल्हापूर, लातूर आयुक्त, महिला व बालविकास विभाग, आयुक्त सामाजिक न्याय विभागाचे संबंधित अधिकारी ऑनलाइन उपस्थित होते.

उपसभापती गोऱ्हे म्हणाल्या की, राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात सुरक्षा गृह (सेफ हाऊस) अंमलबजावणी करावी आणि बाबतचा सविस्तर अहवाल ३० जानेवारी २०२५ पर्यंत सादर करावा. ऑनर किलिंगच्या घटनेमधील पीडित मुलींचे समुपदेशन व्हावे तसेच मनोधैर्य योजनेतून पीडित महिलेला काही मदत म्हणून लाभ देता येईल का पाहावे. त्यामुळे अशा मुलींना मदत होईल. तसेच या पीडित महिलांना सक्षम करण्यासाठी कौशल्य विकास कार्यक्रम अंतर्गत त्यांना प्रशिक्षण देऊन रोजगार निर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी आराखडा तयार करावा, अशा सूचनाही यावेळी त्यांनी दिल्या.आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांचे सामाजिक मानहानी, कौटुंबिक त्रास आणि ऑनर किलिंगपासून संरक्षण करण्यासाठी अॅट्रॉसिटी'च्या धर्तीवर 'आंतरजातीय विवाह कायद्या'ची निर्मिती करण्यासाठी समिती गठीत केली होती. या समितीचे पुनर्गठन करावे. आपत्कालीन परिस्थितीत महिलांना त्वरित मदत मिळावी, यासाठी सुरू करण्यात आलेल्या महिला सुरक्षेसाठीच्या हेल्पलाइन आणि विविध समित्यांची राज्यस्तरीय प्रचार प्रसिद्धी करावी, ज्यामुळे महिलांना सुरक्षितता आणि कायदेशीर मदत वेळेत उपलब्ध होईल आणि या महिलांना कायदेशीर संरक्षण मिळेल, असेही उपसभापती गोऱ्हे यांनी यावेळी सांगितले.

## नांदेड शहरातील कोचींग क्लासेसचे प्रभारी, एमआयडीसी कृष्णुर व सिडको

# नांदेड येथील व्यापारी व वैद्यकीय अधिकारी यांची पोलीस अधीक्षक,नांदेड यांनी घेतली बैठक






लोकनेता न्यूज नेटवर्क

नांदेड | बाजीराव गायकवाड

थोडक्यात हकीगत दिनांक १३/०१/२०२५ रोजी व दिनांक १४/०१/२०२५ रोजी नांदेड शहरातील सर्व कोचींग क्लासेसचे प्रभारी, एमआयडीसी कृष्णुर व सिडको नांदेड येथील व्यापारी व नांदेड शहरातील सर्व हॉस्पीटल मधील वैद्यकीय अधिकारी यांचेशी पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड येथे विविध विषयावर संवाद साधण्यासाठी मा. श्री अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड यांनी तीन वेगवेगळ्या बैठकीचे आयोजन केले होते.

सदर बैठकी मध्ये मा. श्री अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक, नांदेड यांनी कोचींग क्लासेसचे प्रभारी, एमआयडीसी मधील व्यापारी व नांदेड शहरातील वैद्यकीय अधिकारी यांचेशी संवाद साधुन त्यांचे अडीअडचणी जाणुन घेतल्या.जिल्ह्यातील उद्योग व्यवसाय सुरळीतपणे चालावे, त्यांना कोणतेही असमाजिक तत्व विनाकारण, नाहक त्रास देऊ नये. तसेच त्यांना निर्माण होणाऱ्या अडीअडचणी, त्यावरील उपाय योजना याबाबत सखोल चर्चा करण्यात आली.नांदेड जिल्ह्यातील उद्योग व्यवसाय, त्यांना घालून दिलेल्या अटी व शर्तीचे पालन करून निर्विघ्नपणे चालावे व त्यातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती व्हावी पर्यायाने नांदेड जिल्ह्यात उद्योग व्यवसायासाठी पोषक वातावरण निर्माण व्हावे. यासाठी उद्योजकांना निर्माण होणाऱ्या अडीअडचणी तसेच तक्रारी सोडविण्याकरिता व्हॉट्सअॅप ग्रुप तयार करण्यात आले असून त्यांचेवर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय हे देखरेक करतील. यामार्फत उद्योजकांच्या तक्रारीवर तात्काळ दखल घेऊन उचीत कारवाई करण्यात येणार आहे. जेणेकरून उद्योजकांच्या अडीअडचणी वेळेत सोडविले जातील. एमआयडीसी परिसरात पोलीस पेट्रोलिंग वाढविण्यात येणार असल्याचे पोलीस अधीक्षकांनी सांगितले आहेत.

नांदेड जिल्हा पोलीस दल यापूर्वीही उद्योजकांच्या पाठीशी होते आणि पुढेही उद्योजकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणार असून उद्योजकांना कोणीही बेकायदेशीर पणे त्रास दिल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येणार आहे. असे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी सांगितले असून सदर बैठकीस उपस्थित उद्योजकांनीही पोलीस अधीक्षकांचे आभार मानून समाधान व्यक्त केले.कोचींगचे प्रभारी यांना कोचींग क्लासेसचे परीसरात मुलींचे सुरक्षेसंबंधाने काळजी घेण्याबाबत सुचना देवुन काही महत्वाचे ठिकाणी तक्रार पेटी ठेवुन, विद्यार्थ्यांना काही तक्रार असल्यास तक्रार पेटी मध्ये टाकण्याबाबत सुचना द्यावेत व तक्रार पेटी प्रत्येक आठवडयात पोलीस अधीक्षक कार्यालयातील पोलीस अधिकारी उघडुन योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल याबाबत कळविण्यात आले आहे.कोचींग क्लासेस, डॉक्टर लाईन व एमआयडीसी परीसरात सर्व ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याबाबत सुचना देण्यात आलेल्या असुन सदर परीसर सीसीटीव्हीच्या निगराणीमध्ये राहील्यास सदर ठिकाणी काही घटना घडल्यास तात्काळ कार्यवाही करण्यास सोईस्कर होईल याबाबत माहीती देण्यात आली. परीसरात वेगवेगळ्या पथकाकडुन सतर्क पोलीस पेट्रोलिंग नेमण्यात आली आहे. काही ठिकाणी पोलीस पेट्रोलिंग वाढविण्यासंबंधाने आवश्यकता असल्यास कळविण्याबाबतसुध्दा सांगीतले आहे. तसेच कोणत्याही प्रकारची अडचण किंवा तक्रार असल्यास घाबरुन न जाता पोलीसांना संपर्क करावे असे आवाहन मा. पोलीस अधीक्षक, नांदेड यांनी केले आहे.

## वाल्मिक कराड यांच्यावरील खोटे गुन्हे परत घ्या

# अन्यथा कराड यांच्या समर्थकाचा टॉवरवरुण उडी मारून सामूहिक आत्मदहन करनार प्रशासनास इशारा

## परळी तालुक्यातील महिलांचा आक्रोश जोडे मारो आंदोलन करत चुलबंद आंदोलन!

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

वाल्मिक अण्णा कराड यांच्यावर केज पोलीस स्टेशन येथे कराड यांच्यावर खोटा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरील खोटा गुन्हयात वाल्मिक अण्णा यांना अटक करण्यात आली आहे. परंतु त्यांना संतोष देशमुख खुन प्रकरणात ३०२ चा आरोपी करण्यात यावे व त्यांच्यावर मोक्का कायद्यांतर्गत कारवाई करण्यात यावी यासाठी संतोष देशमुख यांचे कुटूंबीय व मराठा समाजाचे जातीयवादी नेते हे प्रशासनावर बेकायदेशीर आंदोलन करून दबाव आणत आहेत. तपास यंत्रणेवर सुध्दा दबाव येत असल्यामुळे प्रकरणाला वेगळे वळण लागण्याची शक्यता आहे. तसेच जिल्हयामध्ये जातीय तेढ निर्माण होऊन दिड महिना झाला आहे. व सामाजिक शांतता धोक्यात आलेली आहे. त्यामुळे आम्ही सर्वजण वाल्मिक अण्णा कराड यांच्या समर्थनार्थ आज रोजी राणी लक्ष्मीबाई टॉवर येथे सामुहिक आत्मदहन करणार आहोत. असा इशारा देत परळी येथील राणी लक्ष्मीबाई टॉवर वर चढत आंदोलन करण्यात येत आहे, तरी सदर प्रकरणाची प्रशासनाने गंभीर दखल घेवुन सामाजिक दबाव टाकुन कायदा सुव्यवस्था बिघडवणाऱ्या समाजकंटकावर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. व वाल्मिक अण्णा यांच्यावर जे खोटे गुन्हे दाखल करण्यात आले आहे ते तात्काळ वापस घेण्यात यावे. जर काही अनुसूचित प्रकार घडला तर त्यास सर्वस्वी जबाबदारी ही प्रशासनाची राहील असेही बोलल्या जात आहे.





## ग्रामपंचायत कार्यालयाचे दार तोडून आतील साहित्याची नासधुस

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**

बिलोली तालुक्यातील अटकळी येथील असलेल्या ग्रामपंचायत कार्यालयाची १३ रोजीच्या मध्यरात्री साडेबाराच्या सुमारास गावातीलच दोन व्यक्तीने ग्रामपंचायतचे दाराची तोडफोड करत कार्यालयातील साहित्याची नासधुस केली असल्याने महिला सरपंच कुसुमबाई बत्तलवाड यांच्या फिर्यादीवरून रामतीर्थ पोलिसात त्या दोन व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बिलोली तालुक्यातील रामतीर्थ पोलीस ठाण्याच्या हद्दीत येत असलेल्या अटकळी येथे ग्रामपंचायत फोडल्याप्रकरणी येथील महिला सरपंच कुसुमबाई बत्तलवाड यांनी रामतीर्थ पोलीस ठाणे येथे स्वतः हजर राहत गावातील बालाजी किसन मुर्के व रोहीत जाकुरे हे दोन व्यक्ती १३ रोजीच्या रात्री साडेबारा वाजता एका बुलेट मोटरसायकलवर येवुन सबलने ग्राम पंचायत कार्यालयांचे मुख्य दार तोडून आतील साहित्याची नासधूस केली आहे. हे कृत्य करताना गावातील दयानंद भद्रे, उपसरपंच रणविर डोंगरे, गजानन पारते, माधव बोंगाळे, राजेश पोलकमवाड व इतर लोकांनी पाहीलेले आहे. असे नमूद करत हे कृत्य करण्याचे त्या दोघांना कारण विचारले असता त्यांनी १३ रोजी अटकळी ग्रामपंचायत येथे झालेल्या लोक अदालत कार्यक्रमात विद्यमान चेअरमन बजरंग बत्तलवाड यांना बसण्यासाठी खुर्ची दिले नसल्याने हे कृत्य करत असल्याचे सांगितले असल्याची महिला सरपंचांनी रामतीर्थ पोलिसात फिर्याद दिली आहे. त्या अनुषंगाने रामतीर्थ पोलिसांनी ग्रामपंचायत कार्यालय सह महादेव मंदिर बांधकाम साहित्याची अशी एकूण ३० हजार रुपयाची नुकसान केले असल्याने नासधूस करणाऱ्या दोन व्यक्तीवर गुन्हा दाखल केला आहे.

## ईजळी येथील बालाजी कल्याणकर यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुदखेड । किशोर मुंगल**

पंचायत समिती पाणी पुरवठा विभागाचे कर्मचारी बालाजी कोंडीबा कल्याणकर ५७ यांचे हृदयाविकाराच्या झटक्याने दि. १३ जानेवारी रोजी सकाळी निधन झाले. ईजळी येथील बालाजी कोंडीबा कल्याणकर हे गावकऱ्यां सोबत देवदर्शनासाठी नागपूरकडे गेले होते त्यांच्या पश्चात पत्नी दोन मुले, तीन मुली असा परिवार आहे. त्यांच्यावर ईजळी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



## धनमुद्रा अर्बन बँक लोहा कडून पत्रकार दिन व पोलीस दिन साजरा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । विशाल घंटे**




धनमुद्रा अर्बन मल्टिस्टटे को- ऑपरेटिव क्रेडिट सोसायटी लिमिटेड नांदेड च्या लोहा शाखा तर्फे आज रोजी पत्रकार दिन आणि पोलीस वर्धापन दिनानिमित्त पत्रकार बांधव तसेच पोलीस बांधवांचा सत्कार व दिनदर्शिका २०२५ प्रकाशन सोहळा आयोजन करण्यात आले होते.
धनमुद्रा अर्बन लोहा शाखा तब्बल मागिल ०२ वर्षापासून कार्यरत असून कमी कालावधी मध्ये आपल्या व्यवहार व सर्व्हिस ने शाखा सभासदामध्ये एक एक विश्वासाचा वेगळाच ठसा उमटविला आहे.
आज च्या या सत्कार शुभेच्छा कार्यक्रमांमध्ये लोहा पोलिस स्टेशन चे कर्तव्यदक्ष सहायक पोलिस निरीक्षक श्री राम केदार साहेब यांच्या सह पोलिस अमालदार गुरुनाथ कारामुंगे बीट जमादार नारायण कदम सह पोलिस बांधव, पत्रकार बांधव सामाजिक कार्यकर्ते या कार्यक्रमाला उपस्थित होते.
पोलिस अमालदार गुरुनाथ कारामुंगे यांनी कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल लोहा पोलिस स्टेशनच्या वतीने आभार व्यक्त केले व शाखेत पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. माजी नगरसेवक उत्तम महाबळे यांनी देखिल लोहा शाखेच्या कामकाजाचे कौतुक करत पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.
तर धनमुद्रा अर्बन शाखा लोहा चे शाखा व्यवस्थापक श्री एकनाथ विश्वासराव यांनी सर्व प्रकारचे लोन सोन तारण फिक्स डिपॉझिट मोबाईल बँकिंग पिग्मी डिपॉझिट ज्येष्ठ नागरिक योजना अशा अनेक योजनांचे सविस्तरच्या माहिती देत आलेल्या सर्व पत्रकार बांधव पोलीस बांधव सामाजिक कार्यकर्ते यांचे आभार मानत आपले मनोगत व्यक्त केले.

## साधू संत येती घरा तोची दिवाळी दसरा

लोकनेता न्यूज नेटवर्क



राष्ट्रसंत, आदर्श समाज सुधारक, ऐश्वर्यसंपन्न संत श्री भगवान बाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्त जालना तालुक्यातील मौजे सोनदेव येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.
आज अखंड हरिनाम सप्ताहाच्या समारोपप्रसंगी श्री चंद्रशेखर बाबा संस्थान चौंडी ता. धारूर जि.बीड येथील ह. भ. प. आप्पासाहेब महाराज चौरे यांचे काल्याचे किर्तन झाले. यावेळी आप्पासाहेब महाराज चौरे यांनी भाजपा किसान मोर्चाचे जालना जिल्हा अध्यक्ष तथा जालना कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक श्री ज्ञानेश्वर (माऊली) शेजुळ यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. योगायोगाने आज ह.भ.प. आप्पासाहेब चौरे महाराज यांचा वाढदिवस सुद्धा होता. त्यानिमित्त श्री ज्ञानेश्वर शेजुळ यांनी चौरे महाराज यांचा शाल आणि श्रीफळ देऊन सत्कार केला. याबरोबरच महाराजांच्या शुभेच्छा सर्व मान्यवरांचा सुद्धा श्री ज्ञानेश्वर शेजुळ यांनी शालाने श्रीफळ देऊन सत्कार केला.
याप्रसंगी महाराजांच्या सोबतचे श्री विक्रम पोटे, श्री मुरलीधर केकान, श्री गणपतराव केकाण, श्री शेषराव पोटे, श्री लहुराव पोटे, श्री प्रविन चौरे, यांच्यासह गावातील श्री ज्ञानदेव ढाकणे, श्री रामप्रसाद शेजुळ, श्री महादेव ढाकणे, श्री दिलीप ढाकणे, श्री राजू ढाकणे, श्री भास्कर ढाकणे, श्री ज्ञानदेव ढाकणे, श्री गणेश ढाकणे, श्री प्रदीप ढाकणे, श्री कृष्णा ढाकणे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# आ.चिखलीकर यांच्या आशीर्वादाने मुखेड-कळका-लोहा एसटी बस सुरू

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**



लोकनेते आ.प्रतापराव पाटील यांच्या आशीर्वादाने व माजी जिल्हा परिषद सदस्य दत्तात्रय चंदनफुले आणि माजी पंचायत समिती सदस्य गोविंद शिंदे गुरुजी यांच्या प्रयत्नातून मुखेड रा.प.आगारातून मुखेड -खैरका-बोमनाळी-खंडगांव(ह.)-गोणार-सिरसी(खुर्द)-पेठवडज- मंगनाळी-कळकावाडी-कळका-बोरी(बु.)- नावद्याचीवाडी-आंबुलगा-फुलवळ-कंधार- लोहा मुक्कामी राज्य परिवहन महामंडळाची एसटी बस सुरू झाली आहे.त्याचे वेळापत्रकानुसार लोहा येथून सकाळी ६:०० वाजता निघून मुखेड येथे सकाळी ७:३० वाजता पोहोचेल आणि मुखेड येथून ८:०० वाजता निघून ९:३० वाजता लोहा येथे पोहोचेल.लोहा येथून १०:०० वाजता निघून मुखेड येथे ११:३० वाजता पोहोचेल.त्यानंतर चालक व वाहक बदलून दुपारी २:०० वाजता मुखेड येथून निघून लोहा येथे ३:३० वाजता पोहोचेल.आणि लोहा येथून ४:०० वाजता निघून मुखेड येथे ५:३० वाजता पोहोचेल.तसेच सांयकाळी ६:०० वाजता मुखेड येथून निघून लोहा येथे सायंकाळी ७:३० वाजता पोहोचेल आणि मुक्कामी राहून सकाळी ६:०० वाजता लोहा येथून निघेल अशी माहिती मुखेड आगार प्रमुखांनी दिली आहे.या मार्गावरील सर्व प्रवाशांना आनंद झाला असून त्यांनी लोकनेते आ.प्रतापराव पाटील चिखलीकर साहेब यांचे आभार मानले आहेत तसेच ही एसटी बस सुरू करण्यासाठी माजी जिल्हा परिषद सदस्य दत्तात्रय चंदनफुले आणि माजी पंचायत समिती सदस्य गोविंद शिंदे गुरुजी यांच्या प्रयत्नाला यश आले असून प्रवाशांनी या दोन्ही पदाधिकारी आणि मुखेड आगार प्रमुख यांचे आभार मानले आहेत आणि वाहक,चालक यांचा पुष्पहार घालून त्यांचा सत्कार केला.राज्य परीवहन महामंडळाच्या बसचे स्वागत करण्यात आले असून प्रवाशांमध्ये आनंदाचे वातावरण आहे



हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904